झिनैदा अलेक्सान्द्रोवा

माझे अस्वल

झिनैदा अलेक्सान्द्रोवा

माझे अस्वल

चित्रकार – इरीना कोल्मोगोर्त्सेवा

प्रगती प्रकाशन
मॉस्को

विजेच्या शेगडीवर शिजलीय खीर
चमचा शोधायला फिरते गिरगिर
चला लौकर धुवा हात
ारम जेवण तयार पुढ्यात !

झटकन गळयात नॅपकिन बांधा
कटलेट चॉकलेट गट्टम् करा.
दूदू पिऊन गटगट
फिरायला जाऊ पटपट.

कोंबडा-कोंबड्या फिरतात इथं

पाण्यात बदकं डुंबतात तिथं

बसलाय इथं कुत्रा काळू

घेऊ नको संगती त्याला
चल दोघंच जाऊ भटकायला.



पन्हळीतले पाणी करडू पिते
वट्टारून डोळे तुझ्याकडे बघते.

अरे हा तर हंस, याला कसला भितो?
प्रत्यक्षात मात्र हिचाच पाय लटपटतो!

अरुंदशा पुलावरून पळत
पैलतीरी निघालो करायला गंमत.
खूप डुंबू पाण्यात, शेकू उन्हात पाठी
स्वच्छ कपडे धुवून वाळवू नदीच्या काठी.

खुषीच्या भरात छोट्या अस्वलाने मारली उडी
पण तेवढ्यानेच पुलाची फळी डगमगली,
डुबकन पडले अस्वल पाण्यात खाई गटांगळ्या खाली-वर
धावा पळा कुत्रेराव, खेचा त्याला पाण्यावर!

चिप्प ओले अस्वल भिजले
मखमली कोटाचे तीनतेरा वाजले.
घरी घेणार आई हजेरी
पुरती आमची भंबेरी.

З. Александрова
МОЙ МИШКА
на языке маратхи

अनुवाद : अनिल हवालदार

© मराठी अनुवाद, प्रगती प्रकाशन, १९८०

सोविएत संघात मुद्रित